# **महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**विधान भवन, मुंबई येथील उंच व गोल इमारतीतील किड नियंत्रण सेवा (पेस्ट कंन्ट्रोल) वार्षिक देखभाल याकरिता या क्षेत्रातील उत्पादक/ पुरवठादार नियुक्त करणे संदर्भात...**

विधान भवन, मुंबई येथील उंच व गोल इमारतीतील किड नियंत्रण सेवा (पेस्ट कंन्ट्रोल) वार्षिक देखभालकरिता या क्षेत्रातील पुरवठादार/ ठेकेदार सदर यंत्रणेची देखभाल दुरूस्तीसाठी किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच संबंधितास किड नियंत्रण सेवा (पेस्ट कंन्ट्रोल) देखभाल दुरूस्तीचा शासकीय/ निमशासकीय कार्यालय अनुभव (किटक नियंत्रण ऑपरेशन शासकीय परवाना) असणाऱ्या पुरवठादारास प्राधान्य देण्यात येईल

किड नियंत्रण सेवा (पेस्ट कंन्ट्रोल) देखभालकरिता दरपत्रक भरण्यापूर्वी कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, ग-२ कक्ष शाखा, कक्ष क्र. ०१७, तळ मजला, विधान भवन, मुंबई यांच्याशी संपर्क साधून विधान भवन, इमारतीची प्रत्यक्ष पहाणी करावी. विधानभवन इमारतीमधील दालने, बैठक कक्ष अधिकारी, कर्मचारी दालने कक्ष, उपहारगृह, तीन सभागृह (विधानसभा/ विधापरिषद व मध्यवर्ती सभागृह) इ. ठिकाणी वाळवी नियंत्रण, किटक नियंत्रण, झुरळ, उंदीर नियंत्रण इत्यादीच्या वार्षिक किमान ३ सेवा देण्यासाठी विधानभवनाच्या उंच व गोल इमारतीतील किड नियंत्रण सेवा (पेस्ट कंन्ट्रोल) वार्षिक देखभालकरिता GST सह दर नमूद करून दरपत्रक मोरबंद पाकीटातून सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्यावर दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२६ रोजी किंवा तत्पुर्वी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणांस कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-४,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**